३७६

## MAHARASHTRA ACT No. LX OF 1981

## THE CODE OF CRIMINAL PROCEDURE (MAHARASHTRA SECOND AMENDMENT) ACT, 1981

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १ ऑक्टोबर, १९८१ रोजी मिळाली असल्यामुळे, तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एस. ए. धोत्रे,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. LX OF 1981

## AN ACT FURTHER TO AMEND THE CODE OF CRIMINAL PROCEDURE, 1973 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक ५ ऑक्टोबर, १९८१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६०

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ही महाराष्ट्र राज्यास लागू असताना, तिच्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम**

१९७४ चा २. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ही महाराष्ट्र राज्यास लागू असताना, तिच्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे. त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बत्तिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) अधिनियम १९८१ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव

सन १९७४ चा अधि-नियम २ यात कलम १९७-क समाविष्ट करणे.

२. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, तिच्या कलम १९७ नंतर पुढील कलम दाखल करण्यात येईल :— १९७४ चा २.

दिवाणी न्यायालयाने नेमलेल्या कमिशनर-वरील किंवा धारकावरील खटला.

"१९७-क. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या तरतुदींनुसार, न्यायालयाने, कमिशनर किंवा धारक म्हणून, नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीवर जेव्हा कमिशनर किंवा धारक म्हणून असणारी आपली कामे पार पाडताना किंवा पार पाडत असल्याचे अभिप्रेत असताना तिने जो अपराध केल्याचे अभिप्रेत असेल अशा कोणत्याही अपराधाचा दोषारोप ठेवण्यात आला असेल तेव्हा, अशा व्यक्तीला यथास्थिती कमिशनर किंवा धारक म्हणून नेमणाऱ्या न्यायालयाच्या पूर्वमंजुरीसह असेल ते खेरीज करून, कोणतेही न्यायालय अशा अपराधाची दखल घेणार नाही.". १९०८ चा ५.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.